# आकांक्षित तालुका कार्यक्रम

## कारंजा, जिल्हा वर्धा

आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाच्या धर्तीवर ७ जानेवारी २०२३ रोजी मा. पंतप्रधानांच्या संकल्पनेतून आकांक्षित तालुका कार्यक्रम (Aspirational Blocks Programme - ABP) हा भारत सरकारने NITI आयोग मार्फत सुरू केलेला एक महत्वाकांक्षी उपक्रम आहे, ज्याचा उद्देश देशातील २७ राज्ये आणि ४ केंद्रशासित प्रदेशांतील सर्वाधिक मागासलेल्या ५०० ब्लॉक्समध्ये जीवनमान उंचावण्याचा आहे. या कार्यक्रमाचा उद्देश या भागांमध्ये शासनाच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुधारण्याचा आणि सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणण्याचा आहे. आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी आणि पायाभूत सुविधा या महत्त्वाच्या क्षेत्रांवर या कार्यक्रमात विशेष भर दिला जातो.

वर्धा जिल्ह्यातील कारंजा (घाडगे) तालुका हा आकांक्षित तालुका असून यामध्ये नीति आयोगाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात जेणेकरून तालुका विकासाच्या मुख्य प्रवाहात येईल(Aspirational to Inspirational).
याचाच एक भाग म्हणून NITI आयोगाच्या निर्देशानुसार जुलै २०२४ ते सप्टेंबर 2024 या तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये कारंजा तालुक्यात संपूर्णता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले होते.
संपूर्णता अभियानाचा मुख्य उद्देश सहा निर्देशांकांवर (Key Performance Indicator) लक्ष केंद्रित करून त्यांची संपूर्ण संतृप्तता (Saturation) सुनिश्चित करणे हा होता. या अभियानाच्या माध्यमातून आरोग्य, पोषण, शेती आणि शिक्षण या महत्वाच्या घटकांमध्ये ठोस सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला, ज्यामुळे आकांक्षित तालुक्यांमध्ये दीर्घकालीन विकासासाठी मजबूत पाया तयार होण्यास शक्य झाले.
या अभियानात खालील ६ निर्देशकांवर विशेष भर दिला गेला:

1. गर्भवती महिलांची पहिल्या त्रैमासिकात नोंदणी (ANC)
2. मधुमेह (Diabetes) तपासणीतील प्रगती
3. उच्चरक्तदाब (Hypertension) तपासणीतील प्रगती
4. गर्भवती महिलांना पूरक पोषण मिळण्याचे प्रमाण (ICDS अंतर्गत)
5. माती परीक्षण आणि Soil Health Card चे वाटप
6. स्वयं-सहायता गटांना (SHG) Revolving Fund चा लाभ मिळणे

**संपूर्णता अभियान सन्मान समारोह :**

आकांक्षित ब्लॉक करंजा यांनी संपूर्णता अभियानात दिलेल्या महत्त्वाच्या निर्देशकांमध्ये १००% संतृप्तता (पूर्णता) साधली आहे. हे यश उत्कृष्ट नेतृत्व, नवनवीन उपक्रम, आणि लक्ष्य गाठण्याची मजबूत बांधिलकी याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.
ही कामगिरी जिल्हा व ब्लॉक स्तरावरील प्रशासनाच्या एकत्रित आणि समर्पित प्रयत्नांचे फलित आहे. तसेच, ही यशोगाथा संपूर्णता अभियानाच्या उद्दिष्टांना प्रत्यक्षात उतरवणारी आहे.
या उल्लेखनीय यशाचं कौतुक करण्यासाठी आणि करंजा तालुक्यातील तालुकास्तरीय अधिकारी आणि फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय प्रयत्नांचे अभिनंदन करण्यासाठी, NITI आयोगाने "संपूर्णता अभियान सन्मान समारंभ" या नावाने जिल्हास्तरीय पुरस्कार कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. हा कार्यक्रम ३ ऑगस्ट २०२५ रोजी करंजा येथे आयोजित केला जात आहे.
यासोबतच "व्होकल फॉर लोकल" या उपक्रमाला बळकटी देण्यासाठी एक सात दिवस चालणारा "आकांक्षा हाट" देखील आयोजित केला जात आहे. या हाटच्या माध्यमातून स्थानिक कलावंतांना

आपले हस्तकौशल्य सादर करण्याची संधी मिळेल, तसेच स्वयंसहायता गटांतील महिलांना आपल्या उत्पादने विक्री व प्रदर्शनासाठी एक मंच प्राप्त होईल.

**आकांक्षित तालुका कार्यक्रमातील कारंजा तालुक्याची प्रगती**

कारंजा तालुक्यात आकांक्षित तालुका कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध विकासात्मक कामे प्रभावीपणे राबविली जात आहेत. यामुळे नीति आयोगाने दिलेल्या ४० पैकी १७ Key Performance Indicators (KPI) पूर्णत्वाच्या टप्प्यावर पोहोचले आहेत. याच यशाचा परिणाम म्हणून, एप्रिल २०२४ ते जून २०२४ या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत कारंजा तालुक्याला देशपातळीवर Delta Ranking प्राप्त झाली असून, त्यासोबत नीति आयोगाकडून १.५ कोटी रुपयांचे बक्षीसही मिळाले आहे.

संपूर्णता अभियानांतर्गत कारंजा तालुक्यातील ६ निर्देशांकांपैकी ४ निर्देशांक १००% संतृप्त झाले असून, उर्वरित २ निर्देशांक ९०% पेक्षा जास्त संतृप्ती प्राप्त केली आहे.

**संतृप्त करण्यात आलेले निर्देशांक:**

- गर्भवती महिलांची पहिल्या त्रैमासिकात नोंदणी (ANC)
- मधुमेह (Diabetes) तपासणीतील प्रगती
- उच्चरक्तदाब (Hypertension) तपासणीतील प्रगती
- स्वयंसहायता गटांना (SHG) Revolving Fund चा लाभ

**विशेष उपलब्धी:**

कारंजा तालुका पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनात एक पथदर्शक तालुका म्हणून पुढे आला आहे. पूर्वी हा तालुका 'Critical' Category मध्ये गणला जात होता, पण आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत जलसंधारणासाठी वनराई बंधारा, नाला खोलीकरण, Loose Boulder Structure, जलतारा आणि विहीर पुनर्भरण यांसारखी विविध उपाययोजना राबविल्यामुळे तालुक्यातील पाण्याची पातळी सुमारे **१०%** ने वाढली आहे.

यामुळे कारंजा तालुका आता 'Critical' Category च्या बाहेर आला असून, भूजल वापराचा टप्पा (Stage of Ground Water Extraction) पूर्वीचा **७२.८४%** वरून आता **६२.०९%** वर आला आहे.

याच कार्याचे सादरीकरण करण्याकरिता मा. जिल्हाधिकारी यांना नवी दिल्ली येथे निती आयोगा मार्फत निमंत्रित करण्यात आले होते.



# संपूर्णता सन्मान समारोह









NITI Aayog
आकांक्षित तालुका कार्यक्रम कारंजा (घा.) जि. वर्धा अंतर्गत
संपुर्णता अभियान सम्मान समारोह
कार्यक्रमाचे अध्यक्ष




CHAMPIONS OF CHANGE
SAMPOORNATA ABHIYAN
आकांक्षित तालुका कार्यक्रम कारंजा (घा.) जि. वर्धा अंतर्गत
संपुर्णता
समापन कार्यक्रम
०५ ऑक्टोबर
NITI Aayog


आकांक्षित तालुका कार्यक्रम कारंजा (घा.) जि. वर्धा अंतर्गत
संपुर्णता अभियान
NITI Aayog




उच्च रक्तदाब व
मधुमेह तपासणी
सार्वजनिक आरोग्य विभाग
बाळाचं संपूर्ण लसीकरण, जबाबदार पालकांचं लक्षण,
करून सर्व आजारांचं हरण, देऊया बाळाला पूर्ण संरक्षण
केंद्र, काजळी





CHAMPIONS OF CHANGE
आकांक्षित तालुका कार्यक्रम कारंजा (घा.) जि. वर्धा अंतर्गत
संपुर्णता अभियान शुभारंभ
NITI Aayog




आकांक्षित तालुका कार्यक्रम कारंजा (घा.) जि. वर्धा अंतर्गत
NITI Aayog
शनिवार, दि. ०६ जुलै २०२४
कार्यक्रमाचे अध्यक्ष
खासदार, वर्धा लोकसभा क्षेत्र
प्रमुख उपस्थिती
मा.श्री. दादाराव केचे
आमदार, आर्वी विधानसभा क्षेत्र
विशेष उपस्थिती
मा.श्री. राहुल कर्डिले भा.प्र.से.
जिल्हाधिकारी, वर्धा
मा.श्री. विश्वास शिरसाट
उपविभागीय अधिकारी, आर्वी जि. वर्धा

